# ट्रीपल आयटीमध्ये दोन दिवसांची कार्यशाळा

**इंडियन इन्स्टिट्युट** ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) आणि वर्धेच्या टेक्नोव्हिजन टेक्नॉलॉजीज यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांचे वर्कशॉप २५ आणि २६ मार्चला 'एम्बेडेड सिस्टिम्स ॲण्ड इंटरनेट ऑफ थिंग्ज' (एलओटी) या विषयावर





बोलण्यासाठी स्वप्नील काटोले आणि राहुल फटिंग यांना पाचारण करण्यात आले होते. या दोघांनी लाईट्स, मोटार्स, सेन्सर्स आणि बेसिक एमबेडेड बोर्डस् या वर्कशॉपमध्ये काही स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यात भाग घेणारे वेगवेगळ्या महाविद्यालयाचे विद्यार्थी



पदवी, पदव्युत्तर आणि प्राध्यापकही होते. वर्कशॉपचे समन्वयक डॉ. अनिकेत बुऱ्हाणे म्हणाले, वेगवेगळ्या अभ्यासक्रमांना शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या संवाद घडवणे हे वर्कशॉपचे उद्दिष्ट होते. यास्वरुपाचे वर्कशॉप संस्थेच्यावतीने ना नफा ना तोटा या बेसिसवर राबवले जातात. लवकरच अशाच प्रकारचे उन्हाळी वर्कशॉप घेण्याचे सुतोवाही त्यांनी यावेळी केले. यावेळी विद्यार्थी कल्याणचे प्रमुख डॉ. आतीष दर्यापूरकर यांनी दोन दिवसांच्या वर्कशॉपला विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या प्रतिसादाचे कौतुक केले. मात्र, मर्यादित जागांमुळे जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होता आले नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रमुख पाहुणे सहायोगी प्राध्यापक डॉ. किशोर भूर्चंडी आणि सहयोगी अधिष्ठाता डॉ. अश्विन कोठारी उपस्थित होते. त्यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.